# हिमगिरी को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.

## HIMGIRI CO. OP. HSG. SOCIETY LTD.

Regd. No. NBOM / CIDCO / Hsg. (O.H.) / 178 / JTR / 95-96 Dt. 22-11-95

Office : B-6/0:3, Sector3, CIDCO Colony, Opp. Railway Station, Sanpada (E), Navi Mumbai-400 705.

Ref. No. HCHS/2025-26/147 Date : 18/01/2026

### विशेष सर्वसाधारण सभा दि. ०७.१२.२०२५ चे इतिवृत्तांत

हिमगिरी सहकारी गृहनिर्माण संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दि.०७.१२.२०२५, रविवारी सकाळी ११:०० वा. केमिस्ट भवन हॉल, सेक्टर-८, सानपाडा, नवी मुंबई-४००७०५, येथे आयोजित करण्यात आली होती. परंतु सभासद संख्या कमी असल्याने सदर सभा ११:३० वाजता सुरु करण्यात आली.

सदर सभेस ७५ सभासद उपस्थित होते व त्याबरोबर श्री. महेंद्र सप्रे - अर्बन ॲनालिसिस व श्री. उन्मेष देशपांडे - विधी सल्लागार हजर होते.

संस्थेचे खजिनदार श्री. जनार्दन बनकर यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली व सदर सभेच्या सुचना पत्रिकेचे वाचन केले.

**विषय क्र.१. सभेचे अध्यक्ष निवडणे.**

संस्थेचे खजिनदार श्री. जनार्दन बनकर, यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रविण नारकर यांना सभाध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली व त्यांस श्री. प्रविण नारकर यांनी स्विकृती दर्शविली असता त्यास श्री. बालाजी कोलपुसे यांनी अनुमोदन दिले. अशा प्रकारे सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सुचक : श्री. जनार्दन बनकर
अनुमोदक : श्री. बालाजी कोलपुसे

**विषय क्र. २. मागिल सभेचे इतिवृत्तांत वाचन व मंजुरी.**

श्री. जनार्दन बनकर यांनी श्री. बालाजी कोलपुसे यांना मागिल सभेचे इतिवृत्तांत वाचून दाखविण्याची विनंती केली. त्यानुसार श्री. बालाजी कोलपुसे यांनी मागिल विशेष सर्वसाधारण सभा दि.१२.१०.२०२५ चे इतिवृत्त वाचून दाखविले.

सदर इतिवृत्ताचे वाचन झाल्यानंतर श्री. प्रविण नारकर यांनी सभागृहास इतिवृत्तांताबद्दल काही शंका आहेत का असे विचारले असता श्री. महेश गोडवे यांनी पी.एम.सी. ला आपण ८५ टक्के पेमेंट हे आर.सी.सी. स्लॅब पर्यंत करीत असुन त्यांनी दिलेल्या पेमेंट शेडयुलचा पुनर्विचार करण्यात यावा असे सुचविले. त्यावर यथासांग चर्चा होऊन असे ठरले की, सदर बाबत कार्यकारीणी समिती ही श्री. राजीव गुरव - अर्बन ॲनालिसीस यांच्याशी सल्लामसलत करुन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. महेश गोडवे यांनी सदर इतिवृत्तांतामधे श्री. अब्राहम यांनी दिलेल्या आर.टी.आय. प्रतीचा उल्लेख नसल्याचे सांगितले असता त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन त्याचा इतिवृत्तांतामध्ये समावेश करण्यात येणार नाही असा खुलासा करण्यात आला. अशा प्रकारे सदर इतिवृत्तांत हे सर्वानुमते मंजुर करण्यात आले.

सुचक : श्री. महेश गोडवे
अनुमोदक : श्री. सुनिल लोध

**विषय क्र. ३. सोसायटीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार अर्बन ॲनालिसिस यांनी सादर केलेल्या प्रकल्प व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) बाबत निर्णय घेणे.**

श्री. प्रविण नारकर यांनी दि.१२.१०.२०२५ च्या विशेष सर्वसाधारण सभेचा हवाला देत नेमलेल्या अभ्यास समितीबरोबर २३.११.२०२५ ला झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत वाचून दाखविले असता श्री. अब्राहम व श्री. सुनिल लोध यांनी कायदेशीरपणे एफएसआय (FSI) वितरीत व्हावा असे सुचविले. त्यावर श्री. मारुती घाडगे व श्री. बाजीराव सणस यांनी सीसी/ओसी याचा सुध्दा विचार करण्यात यावा असे सुचविले.

HIMGIRI CO. OP. HSG. SOC. LTD. SECTOR 3 SANPADA NAVI MUMBAI-400 705

Ref. No. Date : 18/01/2026

त्यावर सविस्तर चर्चा होऊन अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले व त्यानंतर प्रस्ताव मांडण्यात आला की, सिडको नकाशानुसार चटई क्षेत्रावर (कारपेट एरिया वर) १४८ टक्के जास्तीचा एरिया सर्व सभासदांना समप्रमाणात वाटप होईल व विकासकाच्या फायदयातुन सीसी/ओसी, ओपन टेरेस, दुकान/गाळे यांना योग्य तो मोबदला देण्याचे निविदा मसुदयात नोंद करावे.

या प्रस्तावास ६८ विरुध्द ७ मताने मंजुरी देण्यात आली व सदर ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

सुचक : श्री. हरिष शेट्टी
अनुमोदक : श्री. चिंतामण भामरे

**विषय क्र. ४. सोसायटी पुनर्विकासासाठी निविदा दस्तावेज (Tender Document) बाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

श्री. महेंद्र सप्रे-अर्बन ॲनालिसिस यांनी सदर निविदा मसुदयातील पान क्र. १२७ हे महत्वाचे असल्याचे सांगुन त्याचे विस्तृतपणे वाचन केले. त्यावर श्री. रविंद्र खरे यांनी पीएमसीस विनंती केली की, जे काही प्रचलित बाजार भावाचे दर आहेत (भाडे, शिफ्टींग चार्जेस, डिपॉझिट वगैरे इ.) त्याचा एक बेस दयावा व जे मुळ सभासद आहेत त्यांना प्रथम सदनिका बांधून द्याव्यात.

श्री. प्रविण नारकर यांनी नमुद केले की, सदर निविदा १४८ पानांची असुन एवढया कमी वेळात निर्णय घेणे घाईचे ठरेल व सभागृहाला आवाहन केले की, निविदेतील सगळया बाबींचा अभ्यास करून कोणाच्या काही सुचना असतील त्या लेखी पत्राद्वारे अथवा ईमेलद्वारे संस्थेच्या कार्यालयात पुढील २१ डिसेंबर पर्यंत सादर कराव्यात व त्यावर अभ्यास समिती, थिंक ॲण्ड टॅक समिती व कार्यकारीणी समिती विचार विनिमय करुन सुधारित निविदा विशेष सर्वसाधारण सभा घेऊन सभेच्या पटलावर ठेवण्यात येईल व त्यावर सभेत सखोल चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्यास सभागृहाने मान्यता दिली व एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक : श्री. बाजीराव सणस
अनुमोदक : श्री. मारुती घाडगे

सभेपुढे इतर कोणतेही विषय नसल्याने संस्थेचे खजिनदार श्री. जनार्दन बनकर यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**कार्यकारीणी समिती**

**श्री. प्रवीण नारकर**
**(अध्यक्ष)**

**श्री. सचिन घोसाळकर**
**(सचिव)**

**श्री. जनार्दन बनकर**
**(खजिनदार)**

१. श्री. बालाजी कोलपुसे, (उपाध्यक्ष)
२. श्री. एस.एम. गोपाल, (उपसचिव)
३. श्री. ज्ञानेश्वर भोर (उपखजिनदार)
४. श्री. जयराज थोरात
५. श्री. शिवाजी पुणेकर
६. श्री. विनोद वाडकर
७. श्रीमती शैलजा म्हात्रे
८. श्री. विवके कानसे
९. श्रीमती सावित्री रामचंद्रन
१०. सौ. जयश्री कठरे

प्रत :
१. सहनिबंधक सहकारी संस्था सिडको, बेलापूर रेल्वेस्टेशन टॉवर, बेलापूर.
२. सोसायटी सभासद
३. सोसायटी नोटीस बोर्ड

HIMGIRI SOCT. LTD. SECTOR 3 SANPADA N. MUMBAI-400 705.